PDFaid.com
#1 pdf solutions

<u>वाहन चालक अनुज्ञप्तीचे नुतनीकरण करणेबाबत</u>

**परिवहन आयुक्त कार्यालय,**
**प्रशासकीय इमारत, ३रा व ४ था मजला,**
**डॉ. आंबेडकर उद्यानाजवळ,**
**वांद्रे(पूर्व), मुंबई-४०० ०५१.**

## परिपत्रक

**क्रमांक :-** एमव्हीएल-०३९९/सीआर-६१२(एच)/का.२(७)/जा.क्र. ११११० , दिनांकः- 29 AUG 2012

बऱ्याच व्यक्तींना परदेशात जावे लागत असल्यामुळे अथवा त्यांना चालक अनुज्ञप्तीचे नुतनीकरण वेळेवर करता येत नसल्यामुळे सध्याच्या जास्तीत जास्त एक महिन्यापूर्वी अनुज्ञप्ती नुतनीकरण करण्याच्या पध्दती ऐवजी, सहा महिने अगोदर नुतनीकरण करता यावे याबाबत वेस्टर्न इंडिया ऑटोमोबाईल असोसिएशन या संस्थेने विनंती केली आहे. तसेच अशा प्रकरणांमध्ये अनुज्ञप्ती प्राधिकाऱ्यांना देखील याबाबत अडचणी येतात.

२. मोटार वाहन अधिनियम १९८८ मधील कलम १५ मध्ये अनुज्ञप्ती नुतनीकरणाबाबत तरतुद विहित केलेली आहे. सदर तरतुदीनुसार अनुज्ञप्ती प्राधिकारी यांना नुतनीकरण करण्याचे अधिकार प्रदान केले असून केंद्रीय मोटार वाहन नियम १९८९ मधील नियम १८ मध्ये अनुज्ञप्तीच्या नुतनीकरणाची कार्यपध्दती विहित केली आहे. त्यानुसार नमुना ९ मध्ये अर्ज करावा लागतो व नियम ३२ नुसार विहित केलेले शुल्क भरावे लागते.

३. मोटार वाहन अधिनियम, १९८८ च्या कलम १५ नुसार जर नुतनीकरणाचा अर्ज हा अनुज्ञप्तीची मुदत संपण्यापूर्वी किंवा मुदत संपल्यानंतर ३० दिवसाच्या आत केल्यास अनुज्ञप्तीचे नुतनीकरण त्याची मुदत संपल्याच्या दिनांकापासून करण्यात येते. जर नुतनीकरणाचा अर्ज हा अनुज्ञप्तीची मुदत संपल्याच्या दिनांकापासून ३० दिवस नंतर केल्यास अनुज्ञप्तीचे नुतनीकरण त्याच्या नुतनीकरणाच्या दिनांकापासून करण्यात येते. तसेच जर नुतनीकरणाचा अर्ज हा अनुज्ञप्तीची मुदत संपल्यानंतर ५ वर्षानंतर केल्यास त्यावेळेस अनुज्ञप्तीधारकास पुन्हा वाहन चालविण्याची चाचणी द्यावी लागते. त्यानंतरच नुतनीकरण करण्यात येते.

४. परिवहन कार्यालयात अनुज्ञप्तीची मुदत संपण्यापूर्वी सर्वसाधारणपणे एक महिन्यापर्यंत अगोदर नुतनीकरण करण्यासाठी अर्ज स्विकारले जातात. तथापि, अनुज्ञप्तीचे नुतनीकरण मुदत संपण्यापूर्वी नेमके किती दिवस आधी करता येऊ शकेल याविषयी मोटार वाहन अधिनियमात विविक्षीत तरतूद नाही. वरील परिच्छेद क्र.१ मधील मागणी पाहता, सर्वसाधारणपणे अनुज्ञप्तीचे नुतनीकरण, वैधता दिनांकाचे समाप्तीपूर्वी ३ महिने आधी पर्यंत करणे व्यवहार्य ठरेल.

५. सबब, सर्व प्रादेशिक/उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांना सूचित करण्यात येते की, उपरोक्त बाबी लक्षात घेता, वाहन चालक अनुज्ञप्तीचे मुदतीपूर्व नुतनीकरण करण्यासाठी अनुज्ञप्तीचे वैधता संपण्यापूर्वी ३ महिनपर्यंत अगोदर अर्ज स्विकारण्यात यावेत व नुतनीकरण ज्या दिनांकाला अनुज्ञप्तीची मुदत संपते, त्या दिनांकापासून करण्यात यावे.

**उप परिवहन आयुक्त,**
**महाराष्ट्र राज्य,मुंबई.**

**प्रति,**
**सर्व प्रादेशिक परिवहन अधिकारी/उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांना आवश्यक कार्यवाहीकरीता.**

**प्रत-** १) सर्व नियंत्रक अधिकारी, परिवहन आयुक्त कार्यालय, मुंबई.
२) वेस्टर्न इंडिया ऑटोमोबाईल असोसिएशन, ७६, वीर नरिमन रोड, पोष्ट बॉक्स क्र.११९०४, मुंबई-४०००२० यांना माहितीकरीता.
३) उप आयुक्त संगणक (वेबसाईटवर प्रसिध्दीसाठी)